Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XII/Jan; 12pp.1-4

ISSN:-2230-7850

Research Papers

# लोकगीते ः लोकसाहित्याचा आत्मा

डॉ.बाबासाहेब म. गोरे
प्राचार्य़ अभिनव अध्यापक महाविद्यालय़ लातूर
अधिष्ठाता़ शिक्षणशास्त्र विद्याशाखा तथा
व्यवस्थापन परिषद सदस्य़ स्वा.रा.ती.म.
विद्यापीठ नांदेड.

## प्रस्तावना :–

लोकवाड्.मयात अत्यंत लोकप्रिय असलेला प्रकार म्हणजे लोकगीत. लोकगीते हा तर लोकसाहित्याचा आत्मा आहे. लोकसाहित्याचे ते प्रमुख अंग आहे. लोककथेईतकाच लोकप्रिय असलेला़ प्राचीन परंपरा लाभलेला दुसरा वाड्.मय प्रकार हा लोकगीताचा आहे.

प्राचीन काळापासून लोकगीतांची निर्मिती अधिकाधिक स्त्रियांची केलेली आढळते. यादृष्टीने एका पाश्चिमात्य अभ्यासकाने लोककथा आणि लोकगीत यांचे नाते स्पष्ट करतांना लोककथेकडे सर्व ललित वाड्.मयाचे 'पितृत्व' दिले आहे. तर लोकगीताकडे सर्व काव्यांचे 'मातृत्त्व' दिले आहे. लोकगीतांचे दालन हे स्त्रियांनीच अधिक प्रमाणात समृध्द केलेले असल्यामुळे लोकगीतांना 'अपौरूषीय वाड्.मय' असे चुकीने संबोधण्यात आले.

वरील अवतरणावरून हे स्पष्ट होते की़ भारतात लोकगीताच्या निर्मितीमध्ये पुरूषापेक्षा स्त्रियांचा अधिक सिंहाचा वाटा आहे़ स्त्रियांनी ज्याप्रमाणे शेतीचा शोध लावला त्याप्रमाणेच तिने लोकगीताचीही निर्मिती केली आहे.

या लोकगीतांचा जन्म कसा झाला हे सांगताना विदर्भातील अभ्यासक ना.रा.शेंडे म्हणतात़ "लोकगीते तर लोकसाहित्याचा आत्मा आहे. या आत्मपिंडातून स्त्रवणारे विविध भाव निर्झर आणि त्यांची लकाकी मनुष्यमात्राच्या जीवनप्रणालीचे व प्रकृती आणि प्रवृत्तीचे प्रभावी द्योतक आहे. शुन्यातून ध्वनी निर्माण झाला... त्यातून अक्षरे निनादली..... अक्षरांनी शब्द बनला आणि शब्दांनी आकार घेऊन एक वेगळे रूप प्रकट केले त्यातच 'मनुष्य' 'मानव' व्यक्त झाला आणि त्याने आपल्या सहजस्फूर्त भावनाद्वारे शुन्याचा आविष्कार घडविला. त्या आविष्कारात लोकगीताचा जन्म झाला. तो संगीतबध्द झाला. त्याने वातावरणात चैतन्या निर्माण केले.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की़ माणूस पहिल्यांदा आपल्या सहजभावना लोकगीताच्या माध्यमातून व्यक्त करीत होता.

लोकगीतांच्या निर्मितीमागे 'लोकगीत आणि समूहमन' यांचा निकटचा संबंध आहे. लोकगीतातून सामूहिक मनाचा आविष्कार होतो. मानवी जीवनाच्या सर्व पैलुंचे दर्शन त्यात घडत असल्यामुळे त्याला सामुहिक पातळी प्राप्त होते. लोकगीते सर्वांना सुचत असली तरी कुणा एका व्यक्तीचा त्याच्यावर अधिकार नसतो. यासंदर्भात डॉ.सरोजिनी बाबर म्हणतात की़ "विविध प्रकारांच्या जातीवंत स्वरविलासानी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षा मागे रचिले असताही केवळ पाठांतराच्या बळावर पिढयान् पिढया आपल्या नवनवोन्मेषशाली तेजाने पुढच्या पिठढीला उत्तेजित करणारे भावगीत होय. लोकगीत म्हणजे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय".

वरीलप्रमाणे लोकगीत हे सामूहिक भावनांचा उत्कट आविष्कार आहे. तसेच लोकगीताची मुल़ प्रेरणा ही सामाजिकच आहे. यादृष्टीने इतिहासाचार्य वि.का. राजवाडे म्हणतात़ "लोकगीते उत्सवप्रसंगी भक्तीभावाने तल्लीनता प्राप्त झाली असता व सामाजिक मन एकतान झाले असता निर्माण होतात. लोकगीतांतून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. तसेच धर्म़ भाषा़ विधी इ. समाजजीवनाच्या विविध अंगांशीही लोकगीते संबंधित असतात. थोडक्यात असे म्हणता येईल की़ लोकगीतांच्या प्रेरणा व्यक्तिगत़ कलात्मक असल्या तरी त्यात सामाजिक प्रेरणांचाच प्रभाव अधिक दिसून येतो.

लोकगीताची निर्मिती ही स्त्रियांनी केली असावी पण ती निर्मिती कोणत्या काळात निर्माण झालेल्या हे सांगणे अवघड आहे. तसेच लोकगीते ही एका काळाशी संबंधित राहत नाहीत ती सर्वकाळाशी संबंध ठेवतात. लोकगीताचे अस्तित्त्व हे सर्वकाळाशी असते हे लोकगीताचे महत्तम वैशिष्टय आहे. यासंदर्भात डॉ.प्रभाकर मांडे म्हणतात़ "लोकगीते हे कोणत्या तरी काळात कुणीतरी निर्माण केलेली असली तरी त्याचे अस्तित्त्व कालपरिणामात सामावत नाही. त्याचे आवाहन सार्वकालीक असते ते कोणत्या काळी कुनी रचले हे प्रश्न येथे अप्रस्तुत असल्यामुळे कर्त्याचा उल्लेख आढळत नाही. एखाद्या काळाशी लोकगीते जखडले गेले तर तो काळ गेल्यावर ते गळून पडते़ नष्ट होते. म्हणून एक गति अमुक एका काळी़ अमुक एकाने निर्माण केले असे निश्चितपणे सांगता येणे शक्य नसते. ज्याप्रमाणे एखादा समाज केव्हा अस्तित्वात आला व

त्याची संस्कृती केव्हा सुरु झाली हे सांगणे कठीण असते . त्याचप्रमाणे संस्कृतीचा घटक असलेले लोकगीत केव्हा निर्माण झाले यासंबंधी काही सांगणे अवघड असते . लाकगीत हे नेहमी समकालीन असते . ते नवे किंवा जुने असत नाही असू शकत नाही . लोकगीतांची परंपरा पाहण्याचा प्रयत्न लिखित वाङ्.मयातील उल्लेखाच्या आधारे आपण करीत असलो तरी त्याचा इतिहास लिहिता येणे शक्य नसते . ती सार्वकालिक असतात आणि नेहमी वर्तमानच असतात .

लोकगीतांची परंपरा मौखिक आहे . ती मैखिक परंपरेनी चालत आलेली असतात . लोकगीताची निर्मिती निरक्षरातच होत असल्याने लोकगीताचे स्वरूप मौखिक आहे . मौखिक परंपरेने लोकगीतांचे आदानप्रदान होत असते आणि हे आदानप्रदान होत असतांनाच लोकगीताची जडणघडण होत असते . त्यातून ती विकसित होत असतात . लोकगीते ही कोण्या एकाच्या मालकीची नूतन ती सामूहिक असल्यामुळे त्यात परिवर्तन होत असते . त्यात लवचिकपणा असतो आणि हे परिवर्तन हा लवचिकपणा ही जडणघडण होण्यास लोकगीतांची मौखिक परंपराच मदत करीत असते . मूळचा गाभा कायम ठेऊन बदलत्या प्रवाहात त्यावर वेगळा साजशिणगार घालण्याचे कामही या मौखिक परंपरेत घडत असते .

लोकगीते ही संवादरूपी असतात . लोकगीतातून प्रश्न विचारला जातो आणि प्रश्नाचे उत्तर दिले जाते . प्रश्नोत्तरे हेही लोकगीतांचे वैशिष्टये आहे . अशी लोकगीते द्वंद्वगीतासारखी असतात . अशी लोकगीते आणि नृत्य यांचा जवळचा संबंध असतो . 'घोडबैल संवाद' 'छकडा' 'बोडक्या' ही मराठी लोकगीतांची उत्तम उदाहरणे या प्रकारच्या लोकगीतांची देता येतील . अशा लोकगीतांमधून कधीकधी अध्यात्मिक विषयांचीही गुंफण झालेली दिसते आणि ही लोकगीते मग 'कूटाचे' रूप धारण करतात . प्रश्नोत्तरूपी लोकगीतात पहिल्या चरणात प्रश्न आणि दुसऱ्या चरणात त्याचे उत्तर असते . अशा प्रकारच्या लोकगीतातून 'नाटय' आणि 'जिज्ञासा' हे विशेष प्रकर्षाने जाणवतात . यासंदर्भात डॉ . शरद व्यवहारे हयांनी एक उत्तम संवादाचे उदाहरण दिले आहे .[ं]

बैल ः अरे अरे घोडया श्यानमोडया
ज्या वेळला शंकर गेले गिरजा परणायला
तवा साज कैसा केला ऋ

नवलक्ष चंद्र तारा खिळ हो मूढाला
माझा साज पाहून राज दक्षत भुलला
काय सांगू घोडक्या तुला ऋ

घोडा ः महाराणाच्या ठायी शिपायी भिडलेत येऊन
रण वाडीवले घोडयानं खड्ग वाजे खर्णखण
एकमेकाचे घेती हो प्राण
तेथे बैलाला पुसतो कोण
अरे अरे बैला काय सांगतो भूपाण
तुझ्या अंडाच्या गोटया चोळल्या मांगान
तू मजला म्हणून तुझे वरचे दात पाडले शंकरान्

मनोरंजन प्रबोधन व नाटय या विशेषांनी बहरलेली संवाद व प्रश्नोत्तररूपी ही लोकगीते आहेत .

लोकगीते ही लोकजीवनातून निर्माण झालेली आहेत . म्हणून लोकगीतावर लोकभाषेचा प्रभाव पडलेला आहे . लोकगीते लोकसमूहाच्या बोलीतच असतात आणि बोलीभाषेची प्रवृत्ती स्वतंत्र अशी असते . बोली मौखिक असल्यामुळे प्रमाणभाषेची बंधने तिच्यावर मर्यादा घालू शकत नाहीत . लोकगीताची भाषा सोपी असते . लोकगीताच्या भाषेची जोपासना जडणघडण परंपरेने होत असल्याने भाषेचे प्रत्यक्ष चालतेबोलते शब्द त्यात आढळतात . लोकजीवनातून साकार झालेले अर्थपूर्ण शब्द लोकगीतात गोडवा व आत्मियता निर्माण करतात . लोकगीते ही भाषीक व वाङ्.मयीन सौंदर्याने नटलेली असतात . भावना आणि अर्थाचा मनोहरी मिलाप लोकगीतात आढळतो . यादृष्टीने खालील उदाहरण पाहता येईल[ं]

सारजा सखी उठ कोंबडा बाग देते
गोटयातील गायमाय बोलाया हंबरते
सारजा तुही माही सखी नांदो पृथ्वीवर
चांद सुर्व्या भाऊतुझे आन महया घरावर

लोकगीताची भाषा ही जानपदाची भाषा असते . तिच्यात अस्सल गोडवा व रसरसीतपणा असतो . ही भाषा अर्थसंपन्न करण्यात किती समर्थ आहे हे पुढील ओवीवरून स्पष्ट होते .[ं]

आपण दोघी बहिणी दोन भावाच्या बारवा
मध्ये चंदन हिरवा,
आपण दोघी बहिणी दोन गावाच्या नया
मध्ये झिरा पाणी पिया,

लोकगीतांची भाषा संपन्न आहे आणि त्यातील आशय सहज आणि रमनीयपणे उकलून दाखविणारी ही भाषा लोकगीताचे प्रमुख वैशिष्टय आहे .

वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की लोकसाहित्य शरीर असेल तर ह्या शरीराचा आत्मा खऱ्या अर्थाने लोकगीते आहेत .

संदर्भ ः

1 . Concenters Martings – The study of Flok song, page 2.
2. देशपांडे कमलाताई ः अपौरूषेय वाङ् . मय ह्यप्रस्तावनाह् .
3 . शेंडे ना . रा . ः 'लोकसाहित्य संपदा' पृ . 42
4 . बावर सरोजिनी ः 'लोकसाहित्याचे स्वरूप' प्रभाकर मांडे पृ . 235 वरून .
5 . राजवाडे वि . का . ः 'लोकसाहित्याचे स्वरूप' पृ . 234 वरून उद्धृत .
6 . मांडे प्रभाकर ः लोकसाहित्याचे स्वरूप पृ . 237 .
7 . व्यवहारे शरद ः 'लोकसाहित्य उद्गम आणि विकास' पृ . 3739 .
8 . तैत्रव 41 व 42 .